# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड    जा.क्र.  317/2023    दिनांक : 17.08.2023**

## 1)खुन :–

**मनाठा :–** दिनांक 15.08.2023 रोजी चे रात्री 22.30 वा. चे सुमारास, **मौ. बरडशेवाळा ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे अरविंद देवराव नरवाडे, वय 41 वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर रा. मौ. खरबी पोस्ट कवाना ता. हदगाव जि. नांदेड** याचे एका महिलेशी अनैतीक संबध असल्याचे कारणावरून स्मशानभुमी जवळील गायरानातील पाऊल वाटेवर मौ. बरड शेवाळा येथे यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून लाकडी फळीने पाठीवर, पायावर, डोक्यात, हातावर जोरजोराने मारहाण करून गंभीर जखमी करून खुन केला. वगैरे **फिर्यादी चंद्रमुनी अरविंद नरवाडे, वय 23 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. खरबी कवाना ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे मनाठा** गुरन 94/2023 कलम 302, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री शकडे, मो.क्रं. 9404010999** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :–

**भोकर :–** दिनांक 14.08.2023 रोजी चे 06.00 ते दिनांक 15.08.2023 रोजी चे 10.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी शास्त्रीनगर भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाई हया त्यांचे घरास कुलूप लावुन भावजई सोबत नाशिक येथे मुलांकडे गेली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे कुलूप कोंडा तोडुन आत प्रवेश करून घरातील संसार उपयोगी भांडी व इतर सामान टी व्ही, गॅस, नगदी रूपये व चांदीचे दागीने असा एकुण 32,300/–रूपयाचा माल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी गयाबाई भ्र. गणेश चार्लेवाड, वय 39 वर्षे, व्यवसाय घरकाम व मजुरी रा. शास्त्रीनगर भोकर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं. 293/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2401 जाधव, मो.क्रं. 9850493110** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :–

**1)बिलोली :–** दिनांक 12.08.2023 रोजी चे 09.30 ते दि. 13.08.2023 चे 09.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरासमोर देशमुख नगर पोस्ट ऑफिस समोर बिलोली ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा पॅशन प्रो कंपणीची मो सा क्रमांक एमएच–26/बीएन–1824 किंमती 30,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी मिर्झा अकबर बेग पि. अहेमद बेग, वय 40 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. दे शमुखनगर पोस्टे ऑफिस समोर बिलोली ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 149/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2351 मुदेमवार, मो. क्रं. 9049778709** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :–** दिनांक 14.08.2023 रोजी चे 18.00 ते 21.00 वा. चे दरम्यान, **विवांश हेल्थ क्लब नांदेड रिलायन्स मॉलच्या बाजुला रोडवर नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा स्पलेंडर प्लस कंपणीची मो सा क्रमांक एमएच–26/एझेड–5587 किंमती 30,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी मोहम्मद समीर हुसेन पि. मोहम्मद हुसेन, वय 33 वर्षे, व्यवसाय जिम ट्रेनर रा. लेबर कॉलनी ह. मु. नोबल कॉलनी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 319/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2014 सिरसाट, मो. क्रं. 9423306245** हे करीत आहेत.

## 4)चोरी :–

**अर्धापुर :–**दिनांक 14.08.2023 रोजी चे सायंकाळी 18.00 ते दि. 15.08.2023 चे सकाळी 05.00 वा. चे दरम्यान, **मौ. आंबेगाव ते आमराबाद रोड आंबेगाव शिवारात ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांच्या कंपणीचे काम चालु असलेल्या आंबेगाव शिवारात कॉंक्रेट मिक्स करण्याच्या मशीनचे बॅचिंग पॅल्टची मोटार 2 एचपी ची त्याची हॅड्रोलीक पंम्प ईनीव्हर्सल कंपणीचे दोनीची किंमत 1,25,000/–रू चे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी शंकर सोपानराव गायकवाड, वय 55 वर्षे, व्यवसाय सुपरवाझर शिंदे ॲड सन्स औरंगाबाद रा. पालम ह. मु. आंबेगाव ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 304/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2544 आने बोईनवाड, मो.क्रं. 9829971005** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :–

**1)शिवाजीनगर :–** दिनांक 01.11.2022 चे 00.00 ते दिनांक 16.08.2023 चे 00.00 पावेतो. **समतानगर नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस लहान सहान कारणावरून शिवीगाळ करून घर बांधकामासाठी तुझे माहेरहुन दोन लाख रूपये आण म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून तीचा शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 20 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 269/2023 कलम 498(अ), 323, 504, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1007 झांबरे, मो.क्रं. 9923922533** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 24.05.2022 रोजी रात्रीचे 10.00 ते दिनांक 17.06.2023 चे 18.00 पावेतो. **दुलेशहा रहेमाननगर खडकपुरा नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे माहेरहुन कर्ज फेडण्यासाठी चार लाख रूपये घेवुन ये म्हणुन तसेच तुला मुलगी कशी झाली असे म्हणुन सतत उपाशी पोटी ठेवुन वारंवार मारहाण करून तीचा शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 22 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 603/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कदम, मो.क्रं. 9881475001** हे करीत आहेत.

## 6)जुगार :–

**1)विमानतळ :–** दिनांक 16.08.2023 रोजी चे 15.25 वा. चे सुमारास, **मुंबई तडका हॉटेलचे समोर नुरी चौक महेबुबनगर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या मिलन डे ओपन नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1220/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2166, दारासिंग पि. लच्छमाजी राठोड, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 284/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री पांचाळ**, **मो.क्रं. 9423437844** हे करीत आहेत.

**2)भोकर :–** दिनांक 16.08.2023 रोजी चे 14.45 वा. चे सुमारास, **बालाजी मंदीराकडे जाणारे रोडचे डाव्या बाजुस हाके यांचे बिल्डींग मधील सेंटर मध्ये भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या श्रीदेवी टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1200/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/815, परमेश्वर जिवनराव कळणे, ने. पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 294/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री दिलीप जाधव**, **मो. क्रं. 8605430645** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड    जा.क्र.  318 / 2023    दिनांक : 17.08.2023

**नांदेड शहरात राबविले कोम्बींग ऑपरेशन...**

नांदेड शहरातील गुन्हयास प्रतिबंध करून गुन्हेगांराना गुन्हे करण्यापासुन प्रतिबंध करण्यासाठी प्रभाविपणे नाकाबंदी करून कोंम्बीग ऑपरेशन राबवण्याच्या सुचना **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांनी **मा. श्री. अबीनाश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड व शहरातील उप–विभागीय पोलीस अधिकारी **मा. श्री सुरज गुरव**, उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड शहर, **मा. श्री. सुशिलकुमार नायक**, उपविभागीय पोलीस अधिकारी इतवारा यांना व शहरातील पोस्टे प्रभारी अधिकारी यांना देण्यात आल्या होत्या.

त्या अनुषंगाने दिनांक 16.08.2023 रोजी चे रात्री 11.00 वाजल्यापासुन ते दिनांक 17.08.2023 चे पहाटेचे 05.00 वाजे दरम्यान शहरातील संपूर्ण पोलीस स्टेशनच्या हद्दीत नाकाबंदी पॉईंट लावण्यात आले होते. सदर नाकाबंदी मध्ये कोम्बींग ऑपरेशन राबवुन शहरातील दोन उपविभागीय पोलीस अधिकारी सहा पोस्टेचे प्रभारी पोलीस अधिकारी व गुन्हे शोध पथकातील अंमलदार, आरसीपी, क्युआरटी अंमलदार यांनी **मा. श्री. आबिनाश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड यांचे नेतृत्वात राबविण्यात आले. सदर कोम्बींग ऑपरेश दरम्यान एकुण 133 आरोपी चेक केले. त्यापैकी 34 आरोपीतांना पोलीस स्टेशनला आणुन त्यांच्या सध्याच्या हालचाली विषयी व गुन्हेगारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्यात आली. कलम 110 / 117 म. पो. कायदाचे 65 केसेस, कलम 122 म. पो. कायदाच्या दोन केसेस, भारतीय हत्यार कायदाखाली एक केस, चोरीचा एक आरोपी पकडण्यात अला. अवैध वाळुच्या दोन केसेस, बेलेबल आणि नॉन बेलेबलचे 9 वॉरंट तामील करण्यात आले. तर 19 जणांना संमस तामील करण्यात आले.

सदरची कार्यवाही **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली **मा. श्री आबिनाश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री सुरज गुरव**, उपविभागीय पोलीस अधिकारी उप विभाग नांदेड शहर, **मा. श्री. सुशिलकुमार नायक**, उपविभागीय पोलीस अधिकारी इतवारा, शहरातील सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी व गुन्हे शोध पथकाचे अंमलदार व आरसीपी व क्युआरटीचे अंमलदार यांनी पार पाडली.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड


TAWAKKAL
PAN SHOP
توکل پان شاپ


TAWAKKAL
PAN SHOP
توکل پان شاپ

